Office of the Collector HINGOLI

# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
## नगर परिषदे अंतर्गत रिक्त पदांसाठी
## सरळसेवा भरती प्रक्रीया सन - 2012

**जाहिरात क्रमांक 1/2012/नपा.प्र./आस्था/कावी 56 दि. 19.12.2012**
**अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक : 05.01.2013**

नगर पालीका प्रशासन संचलनालय शासकीय परिवहन सेवा इमारत , 3 रा मजला वरळी मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.नपप्रस/2004/17/एचआय/1/प्रलंबित/पदनि/प्र.क्र.645/2006/का-24 दिनांक 27.01.2006 , नगर पालीका प्रशासन संचलनालय शासकीय परिवहन सेवा इमारत , 3 रा मजला वरळी मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.नपप्रस/कक्ष-5/संवर्ग/श्रेणी क / हिंगोली / सरळसेवा 2010 दि.24.12.2010 आणि नपप्रस/कक्ष-5/सरळसेवा भरती / 2012/ दिनांक 29.11.2012 अन्वये हिंगोली जिल्हयातील नगर पालीकां कार्यालयातील रिक्त असलेली श्रेणी क मधील पदे भरण्यास मान्यता दिली आहे. सदरील पदे भरण्यासाठी **दिनांक 13.01.2013 ( रविवार )** या दिवशी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी लेखी परीक्षा घेण्याचे आदेशीत केले आहे.

त्याअनुषंगाने खालील प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून जिल्हा निवड समितीमार्फत निवड करण्यासाठी या जाहिरातीद्वारे विहित नमुन्यातील अर्ज दिनांक 05.01.2013 पर्यंत ( रविवार व सार्वजनिक सुटटीचे दिवस वगळून ) कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहेत.

सरळसेवेअंतर्गत भरावयाच्या पदांचा प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली अंतर्गत ( नगर पालीका प्रशासन ) एकूण भरावयाची पदे 18**

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणीक अर्हता | भरावयाची पदे |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 01 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी क ) वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 | 1.शासन मान्य विद्यापिठाची स्थापत्य विषयातील पदवी (B E Civil) पदविका (D E Civil ) असणे आवश्यक पदविधारकास प्राधान्य<br>2.MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>3.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 05**<br>1.अ.जा.-01(समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>2.अ.ज.-01 ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त<br>3.खुला 03 ,( 01 महिला, 02 समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
| 02 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्यूत) (श्रेणी क ) वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 | 1.शासन मान्य विद्यापिठाची विद्यूत विषयातील पदवी (B E विद्यूत) पदविका (D E विद्यूत ) असणे आवश्यक पदविधारकास प्राधान्य<br>2.MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>3.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 02**<br>1.अ.जा.-01(समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>2.खुला 01 ,( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
| 03 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक) (श्रेणी क ) वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 | 1.शासन मान्य विद्यापिठाची संगणक विषयातील पदवी / D O E A C C -- Level-A समकक्ष पदवि असणे आवश्यक, पदविधारकास प्राधान्य<br>2.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 02**<br>1.अ.जा.-01(समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>2.खुला 01 ,( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |

| | | | |
|---|---|---|---|
| 04 | महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, मलनिरसारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा (श्रेणी क ) वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 | 1.शासन मान्य विद्यापिठाचा यांत्रिकी / पर्यावरण अभियंता पदवी /पदविका असणे आवश्यक (B E /D E Mechanical / Environmental ) किंवा Environmental Science मधील पदव्युत्तर / पदविका अर्हता .पदविधारकास प्राधान्य<br>2.MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>3.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 05**<br>1.अ.जा.-01(समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>2.अ.ज.-01 ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>3.खुला 03 ,( 01 महिला, 02 समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
| 5 | महाराष्ट्र नगर परिषद लेखापाल / लेखा परीक्षक सेवा संवर्ग (श्रेणी क ) वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4200 | 1.शासन मान्य विद्यापिठाचा वाणिज्य शाखेचा पदविधर आणि I C W A किंवा Chartered Accountant असणे आवश्यक .<br>2.MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले आवश्यक )<br>3.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 03**<br>1.अ.जा.-01(समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>2.अ.ज.-01 ( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त )<br>3.वि.जा./भ.ज. 01 ,( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
| 6 | महाराष्ट्र नगरपरिषद अग्नीशामन सेवा (श्रेणी क -2) वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2800 | 1.शासन मान्य विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक .<br>2.राष्ट्रीय अग्नीश्मन सेवा महाविद्यालय नागपूर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course ) उत्तीर्ण असणे आवश्यक .<br>3..MSCIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक .<br>4.मराठी भाषेचे पुरेपूर ज्ञान आवश्यक . | **एकूण पदे :- 01**<br>1.खुला 01 ,( समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |

**टिप :-** 1.वर दर्शविल्याप्रमाणे एकुण पदांच्या संखेमध्ये व आरक्षणात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

2.वर दर्शविलेल्या पदांबाबत वेळोवेळी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुढील कार्यवाही अनुसरली जाईल.

## अटी व शर्ती :-

### 1. वयोमर्यादा :-

1.उमेदवाराचे वय दिनांक 05.01.2013 रोजी किमान 18 वर्षे पुर्ण तर खुल्या प्रवर्गासाठी कमाल 33 वर्षापेक्षा जास्त नसावे ( मागासवर्गीयांसाठी 05 वर्षाची शिथीलता ) .

2. स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य ब) सन 1991 चे जनगणना कर्मचारी, क) सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील. तसेच सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे इतकीच राहील.

### 2. इतर अटी व शर्ती :-

1. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

2.उक्त पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

3.मागासवर्गीय उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. निवड होणाऱ्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16ब दिनांक12/12/2011मधील तरतुदीनुसार कार्यवाही अनुसरली जाईल )

4.सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी सन 2011-12 या वर्षाचे म्हणजेच दि.01.04.2012 नंतर निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी.

Office of the Collector HINGOLI

5. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अनिओ/10/105/126/सेवा-4 दि.31.10.2005 नुसार दि.01.06.2005 रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांचा नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच म.ना.से.(निवृत्तीवेतन ) नियम 1982 व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.)

6.सामान्य प्रशासन, परिपत्रक दि.01.07.2005 नुसार म.ना.से.(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

7.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडावी.

8.शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

9. स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांना देय असलेल्या सवलती अनुज्ञेय राहतील.

10.उक्त पदे भरणेसाठीची निवड व प्रतिक्षा यादी (01 )वर्षे मुदतीसाठी ग्राहय धरणेत येईल.

11.समांतर आरक्षणांतर्गत त्या- त्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांमधुन जागा भरणेत येतील.

12.सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी /जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित ठेवणे व रद्द करणे अंशतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती, हिंगोली यांचे अधिकार क्षेत्रात राहतील. भरती प्रक्रीये संदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इत्यादी बाबत जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

13.लेखी परीक्षा हिंगोली जिल्हयाचे परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.

## 3. शुल्क (फी) :-

1.उमेदवारांनी अर्जा सोबत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क स्वरुपात शुल्क (फी) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष/ डिमांड ड्राफट जोडणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही स्वरुपात शुल्क (फी) स्विकारली जाणार नाही. डी.डी. (डिमांड ड्राफट) जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे नावाने तसेच हिंगोली येथे देय असलेला असने आवश्यक राहील. डी.डी. (डिमांड ड्राफट)जिल्हाधिकारी,हिंगोली या नावाने नसेल तर अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**1. लेखी परीक्षा व मुलाखत** **खुला प्रवर्ग - 200/-** **राखीव प्रवर्ग- 100/-**

## 4. निवड पध्दती :-

1. उपरोक्त दर्शविलेल्या पदासाठी निवड करतांना 200 गुणांची लेखी परीक्षा घेऊन उमेदवारांची निवड करण्यात येईल.

2. सदर पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठांच्या पदवि परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या ( इयत्ता बारावी ) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौधीक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी 25 गुण ठेवून त्याचप्रमाणे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या अर्हतेचे संबंधित विषया (पदविकेच्या ) बाबत 100 गुण असे एकूण 200 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 27.06.2008 व दिनांक 26.12.2011 मधील तरतूदीनुसार पात्र उमेदवारांची 25 गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येईल.

3. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीचा विचार केला जाणार नाही.

4. वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करणेसाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान 45 % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

5. उमेदवारास समान गुण मिळाल्यास परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रनिम 2007-प्रक्र-46-07-13-अ दिनांक 27/06/2008 तसेच या बाबतीत शासनाकडील इतर निकषानुसार क्रम लावला जाईल.

## 5. अर्ज सादर करण्यासाठीची इतर माहिती :-

1.उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात 30 से.मी. व 20 से.मी. ☐ आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखीत /टंकलिखीत चक्रमुद्रित करुन अर्ज करावा. उमेदवारांनी अर्जातील माहिती /तपशील सुस्पष्ट नमुद करावा. अर्जा सोबत स्वतःचे नांव व पत्ता नमुद केलेला 24 से.मी. ☐ 11 से.मी. आकाराचा रुपये 5 चे पोष्टाचे टिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

2.उमेदवारांनी ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्याचे अलीकडचे छायाचित्र आवेदनपत्रावर विहीत जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट जोडावा.

3.संगणक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

4. उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) चे तत्त्व अनुसूचित जाती/ जमाती व्यतिरीक्त इतर सर्व मागास प्रवर्गाला लागु असल्याने उन्नत /प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2011-2012 या वर्षातील (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. तसेच जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

5. समांतर आरक्षणातील उमेदवारांनी समांतर आरक्षणा बाबतच्या संबंधित प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

6. उमेदवारांनी संपुर्ण भरलेला आपला अर्ज /शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्राचे साक्षांकित प्रतीसह विहीत नमुन्यात भरुन निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली या पत्त्यावर**दिनांक 05.01.2013** पर्यंत कार्यालयीन वेळेत (संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत ) पोचतील अशा बेताने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. व त्याबाबत कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या संबंधाने उमेदवारां समवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाने विलंबाने प्राप्त झालेले लिफाफे उघडण्यात येणार नाहीत.

7. अर्जाच्या पाकीटवर ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव व सामाजिक (मागासवर्ग) आरक्षणा नुसार प्रवर्ग नमुद करावा.

8. विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, विहीत शुल्काचे डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) नसलेले अर्ज, विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेला व फोटो स्वसाक्षांकित न केलेला अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज, विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, लहान कुटूंबाचे शपथपत्र न जोडलेले अर्ज, उमेदवारांची सही नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

9. या जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील, अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

10. छाननी अंती पात्र/ अपात्र झालेल्या अर्जाच्या याद्या **दिनांक 07.01.2013** पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील तसेच http://hingoli.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. पात्र /अपात्र अर्जावरील लेखी आक्षेप दिनांक 07.01.2013 ते 08.01.2013 या कालावधीत योग्य त्या पुराव्यासह या कार्यालयात स्विकारले जातील. आक्षेप अर्जाचे छाननी अंती अंतिम पात्र उमेदवारांची यादी दिनांक 08.01.2013 रोजी प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परिक्षेसाठी स्थळ, वेळ, प्रवेश पत्राव्दारे U.P.C. ने लेखी कळविण्यात येईल मात्र पोष्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. उमेदवारांचा अर्ज पात्र झाल्यास व त्यांना प्रवेशपत्र न मिळाल्यास दुय्यम प्रवेशपत्र **दिनांक 11.01.2013 व 12.01.2013** रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत या कार्यालयातुन निर्गमित केले जातील.

11. वर नमुद सर्व पदांसाठी लेखी परीक्षा कार्यासन अधिकारी, नपप्रस/कक्ष-5/सरळसेवा भरती / 2012/ दिनांक 29.11.2012 अन्वये संपुर्ण राज्यासाठी एकाच दिवशी म्हणजे **दिनांक 13.01.2013 रोजी (रविवार )** एकाच वेळी घेण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन उमेदवारांनी वर नमुद केलेल्या रिक्त पदांसाठी अर्ज करावेत.

12. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास निवड स्थगीत अथवा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

13. उमेदवारांने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

14. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे असणार नाही.

15.उमेदवारांना लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी येण्याजाण्याचा खर्च स्वतः करावा लागेल.

16.सदर जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेत स्थळावर (Website)वर उपलब्ध आहे. त्याचा पत्ता http://hingoli.gov.in असा आहे.

17.सदर लेखी परीक्षेचा/ अंतीम निवड परीक्षेचा निकाल http://hingoli.gov.in या संकेतस्थळावर ठरवुन दिलेल्या विहीत वेळेवर प्रसिध्द करण्यात येईल.

18. आस्थापनेवरील पदभरतीचे अनुषंगाने वेळो वेळी शासनाकडुन प्राप्त होणा-या सुचनाप्रमाणे आरक्षणाबाबत व इतर सुचनेप्रमाणे कारवाई अनुसरण्यात येईल. व त्या अटी जशाच तशा लागु राहतील.

**दिनांक : 19.12.2012**
**स्थळ - हिंगोली**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी हिंगोली करिता**